स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 27–08–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
|---|---|---|
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 10. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 11. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 12. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 13. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 14. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 2. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. सौ. नयना गुंडे, अपर आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 151:— नागपूर शहरातील सांडपाण्याचे पुर्नचक्रीकरण व पुर्नवापर (NAG-016) हा प्रकल्प पूर्णत्वास आणण्याकरीता महाजेन्कोला रू. 10.00 कोटी मनपाच्या निधीतून मंजूर करून वळते करण्याबाबतचा प्रश्न विचारात घेऊन,

" Recycle & Reuse of Waste Water " NAG-016 हा रू. 130.11 कोटीचा मनपाने तयार केलेला प्रकल्प केन्द्रशासनाचे जेएनएनयुआरएम अंतर्गत दि. 22 डिसेंबर 2006 ला मंजूर करण्यात आला. यातील खर्चाचा 30 टक्के हिस्सा मनपा,

व उर्वरीत हिस्सा 50 टक्के केन्द्रशासन व 20 टक्के राज्यशासन चा राहील. 4 ऑक्टोंबर 2008 ला मनपा व महाजेनको यांच्यात झालेलया करारनाम्यानुसार मनपाचा खर्च (30 टक्के) हा महाजेनकोला करावयाचा आहे व प्रकल्प महाजेनकोच राबवित आहे.

या प्रकल्पाकरीता जेएनएनयुआरएम अंतर्गत रु. 90.00 कोटी येणे अपेक्षित होते. यापैकी मनपाला रु. 59.09 कोटी केन्द्र व राज्शासन मार्फत प्राप्त झालेले आहे. तो निधी महाजेनकोला वळता करण्यात आलेला आहे व 4 थ्या हप्त्याकीरता (रु. 22.76 कोटी) राज्यशासनामार्फत केन्द्रशासनाला मागणी करण्यात आलेली आहे. तसेच या आधी महाजेनकोला मनपा फंडातून रु. 10.00 कोटी सुध्दा वळते करण्यात आले आहेत. असे एकूण रु. 69.09 कोटी मनपाद्वारे महाजेनकोला वळते करण्यात आले आहेत.

मा. उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ येथे सुरु असलेल्या "गोसीखुर्द धरणामध्ये नागनदीच्या सांडपाण्यामुळे होणाऱ्या प्रदुषणाबाबतची" जनहित याचिका क्र. 38/2010 (Dharmik Foundation V/s. Others) मध्ये मनपाने सादर केलेल्या शपथपत्रात हा प्रकल्प जुलै 2015 पर्यंत कार्यान्वित करण्यात येईल असे कळविले होते. पण महाजेनकोच्या दि. 28 जुलै 2015 च्या पत्रान्वये हा प्रकल्प आंशिक कार्यान्वित (Partial Commissioning) ऑक्टों. 2015 व संपूर्ण कार्यान्वित (Fully commissioning) डिसेंबर 2015 पर्यंत करण्यात येईल असे सूचविले आहे. महाजेनकोनी दिलेल्या दि. 28 जुलै 2015 च्या पत्रान्वये हा प्रकल्प पूर्णत्वास आणण्याकरीता महाजेनकोला रु. 20.91 कोटी मनपातर्फे वळते करावयाचे आहेत.

सबब, महाजेनकोला सध्यास्थितीत प्रकल्प पूर्णत्वास आणण्याकरीता मनपा निधीतून रु. 10.00 कोटी (रुपये दहा कोटी) मंजूर करुन वळते करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 152</u>:— प्रभाग क्र. 22 अ गिट्टीखदान सदर येथे विविध सी. सी. पेव्हेमेंटचे कामास्तव रू. 25,99,886/— रकमेच्या प्राकलनास सन 2015—16 चे वित्तीय वर्षात प्रावधान नोंदवून नविन प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे तसेच पद क्र. 681 ( A22001330802) अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 153</u>:— नागपूर महानगरपालिकेच्या उच्च न्यायालयातील वकीलांच्या पॅनलवर असलेल्या वकिलांची सेवा वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या मासीक मानधनावर घेण्यात येत आहे. उच्च न्यायालयाकरीता एकूण 7 वकिलांची नेमणूक करण्यात आलेली असून त्यांच्या मानधनाकरीता रू. 1,97,000/— दरमाह प्रमाणे एकूण रू. 23,64,000/— वर्षाचा खर्च होत आहे. तसेच दरवर्षी वकिलांकडून मानधनामध्ये वाढ करण्याकरीता मागणी होते करीता प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे विधी विभागाने मासीक मानधनाऐवजी प्रकरणा (केस) प्रमाणे वकिलांची फिस

निश्चिती करण्याकरीता विस्तृत अध्यन करून अहवाल तयार केलेला आहे व तो नस्तीच्या उजव्या बाजूला (वान क्र. 13 ते 18 ) माहितीस्तव टाचण केलेला आहे. उच्च न्यायालयाकरीता मासीक मानधनाऐवजी प्रकरणप्रमाणे फिस निश्चिती केल्यास उच्च न्यायालयातील कामे जास्त सुव्यवस्तिति पध्दतीने चालतील व म.न.पा. चा दरमहिन्याचा आर्थिक बोझा अगदी कमी होउन जाईल अशी प्रशासनाची धारणा आहे, करीता मा. आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे विभागीय प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजूरीकरीता सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन मा. उच्च न्यायालयात ज्या प्रकरणात म.न.पा. द्वारे वादी म्हणून किंवा अर्जदार म्हणून प्रकरणे दाखल करण्यात येतात अश्या प्रकरणात संबधीत वकीलास लिपीकीय व इतर खर्च रू. 7,500/— प्रति प्रकरणात अतिरीक्त भुगतान तसेच कायदे विषय अभिमत घेण्याकरीता प्रत्येक अभिमतासाठी वरीष्ठ अभिवक्ता यांना रू. 10,000/— तसेच इतर अभिवक्ता यांना रू. 2,500/— प्रति अभिमत देण्यात यावे या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 154</u>:— हनुमाननगर झोन क्र. 3, प्रभाग समिती ठराव क्र. 07 दिनांक 30.07.2015 अन्वये सन 2015—16 चे अंदाजपत्रकात फेरफार व दुरूस्ती करण्याचे अधिकार मा. सभापती यांना प्रदान करून यास एकमताने प्रभाग समितीने मंजूरी प्रदान केली.

त्यास अनुसरून व मा. प्रभाग समितीच्या सदस्यांच्या सूचना विचारात घेवून मा. सभापती यांनी हनुमान नगर झोन क्र. 3 करीता सादर केलेल्या वर्ष 2015—16 चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास (परिशिष्ट"अ") स्थायी समिती म.न.पा. ची मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पद क्र. A42315170754 या पदाचे करण्यात आलेले पुर्नविनियोजन वगळून इतर पदाच्या पुर्नविनियोजनास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 155</u>:— अर्थसंकल्प 2015—16 मंगळवारी झोन करीता प्राप्त 687.50 लक्ष अंदाजपत्रक विस्तृत विवरणा मध्ये परिशिष्ट "ब" प्रमाणे प्राप्त आहेत.

प्रभाग समिती, मंगळवारी झोन क्र. 10 यांनी आर्थीक वर्ष 2015—16 चे मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पद क्र. A423501704 या पदाचे करण्यात आलेले पुर्नविनियोजन वगळून इतर पदाच्या पुर्नविनियोजनास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 156 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर